## तक्रारदाराची शपथेवर पडताळणी

## मी शपथेवर कथन करते की,

**नाव** – सविता स्वप्नील पाटील.

**वय** – ३० वर्ष, **व्यवसाय** – घरकाम,

**राहणार**– मेढेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**तक्रारदारातर्फे पडताळणी – श्री. आर. आय. पालकर वकील.**

१. सर्व आरोपी माझ्या परिचयाचे आहेत. आरोपी क्र.१ माझा पती असून आरोपी क्र.२ त्याची दुसरी पत्नी आहे. आरोपी क्र.३ माझी सासू, आरोपी क्र.४ हे आरोपी क्र.२ चे वडिल आणि आरोपी क्र.५ व ६ हे आरोपी क्र.२ चे काका व मावशी आहेत. माझे व आरोपी क्र.१ चे दि.२२.०५.२०१७ रोजी लग्न झालेले असून अद्याप पर्यंत आमचा कायदेशीर घटस्फोट झालेला नाही.

२. माझे व आरोपी क्र.१ चे लग्न एकमेकांच्या पसंतीने झाले होते. मी लग्नानंतर आरोपी क्र.१ कडे नांदायला गेले होते. आरोपी क्र.१ त्याचे आई–वडिल व भाऊ–बहिणीं सोबत राहत होता. त्यांनी मला चार महिने चांगले सांभाळले होते. त्यावेळी मी कॉलेजचे शिक्षण घेत असताना आरोपी माझ्या चारित्र्यावर संशय घेत होते. ते मला अवजड कामे करायला लावून व्यवस्थित जेवायला देत नव्हते. ते माझ्याकडे दिवाळीला सोन्याची चेन, संक्रांतीला चांदीच्या वाटीतून तिळगूळाची व पैशांची मागणी करत होते. आरोपी क्र.१ व ३ ची मागणी माझ्या वडिलांनी दिवाळी सणात पुर्ण केली होती. त्यानंतर माझ्या वडिलांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे ते त्यांच्या इतर मागण्या पुर्ण करु शकत नव्हते.

३. त्यामुळे आरोपी क्र.१ व ३ मला टोमणे मारुन माझ्या वडिलांची लायकी नाही असे म्हणत होते. माझे सासरे माझ्या सोबत चांगले वागत होते. आरोपी क्र.१ व ३ यांच्या सोबत माझ्या सास–यांची भांडणे होत होती. त्यानंतर दि.११.०८.२०१८ रोजी माझ्या सास–यांनी आत्महत्या केली होती. त्यानंतर आरोपी क्र.१ व ३ सास–यांनी माझ्यामुळे आत्महत्या केली असा माझ्यावरती आरोप करत होते. मी सासरे

वारल्यानंतर दोन महिने आरोपी क्र.१ व ३ सोबत राहिले होते. त्यानंतर आरोपींनी मला दि.०३.१०.२०१८ रोजी घरातून हाकलून दिले होते. मला घरातून हाकलून दिल्यानंतर आरोपी क्र.१ व ३ यांनी नांदवून घेण्यास कोणताही प्रयत्न केला नाही. मी मधुकर यलगार, सुभाष देसाई, पुंडलिक रांगणेकर आणि चंदन शेटगे यांच्या मार्फत प्रयत्न करुन देखील त्यांनी नांदवण्यास नकार दिला होता. आमची पंचांसमक्ष साळगावच्या जोतिबा मंदिरात शेवटची बैठक झाली होती. त्यावेळी आरोपी क्र.१ ने मला नांदवणार नाही असे स्पष्ट सांगितले होते. तेव्हापासून मी माहेरी राहत असून आरोपी क्र.१ च्या विरोधात पोटगीची प्रकरणे दाखल केली आहेत.

४. त्यानंतर मी आरोपी क्र.१ ने मला नांदावयास नेण्याबाबत गडहिंग्लज न्यायालयात अर्ज केला होता. त्यानंतर मला आमच्या नातेवाईकां मार्फत आरोपी क्र.१ ने आरोपी क्र.२ सोबत लग्न केल्याचे समजले होते. आरोपी क्र.१ नातेवाईकां मार्फत मी त्याला सोडून जावे यासाठी त्याने दुसरे लग्न केल्याचे सांगत होता. त्यामुळे मी दि. ०४. ११.२०२५ रोजी आईसह आरोपी क्र.१ च्या घरी गेले होते. त्यावेळी घरामध्ये आरोपी क्र.२ व ३ हजर होते. मी आरोपी क्र.२ चा घरामध्ये व्हीडिओ करुन फोटो काढले होते. ती मला, 'तुझा काय संबंध, मी लग्न केले आहे व येथेच राहणार' असे म्हणत होती. त्यावेळी आरोपी क्र.३ मला शिवीगाळी करुन कोंडून ठेवले होते. आरोपी क्र.१ दुपारी २.०० ते ०२.१५ वाजेच्या दरम्यान कामावरुन घरी आला होता. त्याने मला कोंडलेल्या बेडरुमची कडी काढून हिला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देऊन शिवीगाळी करत होता.

५. त्यावेळी आरोपी क्र.५ व ६ तेथे आले होते. मी त्यावेळी ११२ क्रमांकावर फोन करुन पोलिसांना बोलावून घेतले होते. त्यांनी मला तेथून सोडवून तुमचे आरोपीं सोबत कोर्टात भांडणे असल्यामुळे निघून जायला सांगितले होते. आरोपी क्र.१ मला आरोपी क्र.२ त्याची पत्नी असून तिला तेथेच ठेवणार आहे असे सांगत होता. मी पोलिसांकडे आरोपीं बाबत कोंडून ठेवून दुसरे लग्न केल्याची तक्रार दिली होती. पोलिसांनी आरोपीं वरती अदखलपात्र गुन्हा दाखल करुन मला न्यायालयात दाद

मागायची समज दिली होती. आरोपी क्र.२ ही कोरज गावची असून मागील दोन वर्षांपासून आरोपी क्र.१ व ३ सोबत राहत आहे. आरोपी क्र.२ चे इस्पूर्ली येथील बाजीराव गुरव यांच्या सोबत पहिले लग्न झाले होते. आरोपी क्र.१ व २ ने लग्न केल्यानंतर आरोपी क्र.२ ने घटस्फोट घेतला आहे.

**६**. आरोपी क्र.१ व २ आज रोजी आजरा येथील महाजन गल्लीत राहतात. आरोपी क्र.१ व ३ ते ६ यांनी संगनमत करुन आरोपी क्र.२ ला घरात आणले आहे. आरोपी क्र.१ व २ पती–पत्नी प्रमाणे राहत आहेत. त्यांनी बेकायदेशीर लग्न केलेले असल्यामुळे त्यांना शिक्षा व्हावी अशी माझी मागणी आहे.

**समक्ष,**

**साक्षीदाराची सही.**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १६.०३.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.